Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ । वर्ष १ । अंक २०० । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा धुमाकूळ! (पान २ वर)



Selected

मुंबई-ठाणे कनेक्टिव्हिटी वाढवण्यावर भर

मुंबई । वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन व्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची घडामोड समोर आली. महानगरपालिकेच्या १३ सदस्यीय परिवहन समितीच्या सभापतीपदी अनुभवी प्रशासकीय अधिकारी अशोककुमार रणखांब यांची बिनविरोध निवड झाली आहे. पालघरच्या जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड यांच्या देखरेखीखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. त्यांच्या निवडीमुळे शहराच्या परिवहन व्यवस्थेत सुधारणा आणि आधुनिकीकरणाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.अशोककुमार रणखांब हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राजपत्रित अधिकारी म्हणून राज्यसेवेत दाखल झाले. नगरविकास विभागात काम करताना त्यांनी विविध महत्त्वाच्या पदांवर जबाबदारी सांभाळली आहे. जळगाव, नाशिक, अहमदनगर, रायगड, ठाणे आणि पालघर या जिल्ह्यांमध्ये त्यांनी मुख्याधिकारी म्हणून काम केले आहे.

राष्ट्रपतींपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत दिग्गजांची उपस्थिती; सिंहस्थ महाध्वजारोहणासाठी प्रशासन सज्ज

नाशिकमध्ये आज 'व्हीआयपी'ची मांदियाळी!

जन सम्राट टाईम्स

नाशिक| सन २०२७ मध्ये नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा महत्त्वपूर्ण टप्पा आज, शनिवार (दि. ३१ ऑक्टोबर) पार पडत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रमुख उपस्थितीत नाशिकच्या रामकुंडावर सिंहस्थ महाध्वजारोहण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

राष्ट्रपतीयांच्या हस्ते ध्वजारोहण; राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची उपस्थिती

या सोहळ्यासाठी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील अनेक मंत्री नाशिकमध्ये उपस्थित राहणार आहेत. सुमारे दीड हजार अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या आगमनाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासकीय आणि सुरक्षा यंत्रणा कामाला लागली आहे.शुक्रवारी रात्रीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार नाशिकमध्ये दाखल झाले. त्यांनी राष्ट्रपतींच्या दौऱ्याची आणि ध्वजारोहण सोहळ्याच्या तयारीची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन, निवास, स्वागत व्यवस्था तसेच



आपत्कालीन यंत्रणांच्या तयारीची माहिती त्यांनी जाणून घेतली. आज दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी नाशिकमधील रामकुंड येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळा पार पडणार आहे. त्यानंतर राष्ट्रपती त्र्यंबकेश्वरकडे प्रयाण करणार असून, तेथे कुशावर्त तीर्थावर पूजाविधी होणार आहे. त्यानंतर त्या नाशिकमधील पोलीस अकादमीत विश्रांती घेतील. सायंकाळी गोदाआरतीला उपस्थित राहण्याचाही त्यांचा कार्यक्रम नियोजित आहे. या सोहळ्यासाठी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, छगन भुजबळ, दादा भुसे, नरहरी झिरवाळ, जयकुमार रावल, डॉ. अशोक उईके, राधाकृष्ण विखे पाटील, गुलाबराव पाटील, आकाश फुंडकर, नीतेश राणे यांच्यासह अनेक मंत्री उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे नाशिकमध्ये आज राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रातील दिग्गजांची मांदियाळी पाहायला मिळणार आहे. नाशिक कुंभमेळा प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय आणि महापालिका प्रशासनाकडून सोहळ्याचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, काही साधू-महंतांमध्ये असलेल्या नाराजीमुळे प्रशासनासमोरील आव्हाने वाढली आहेत.

राष्ट्रपतींच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, सर्व व्यवस्था अंतिम टप्प्यात आणण्यात आली आहे. सिंहस्थ ध्वजारोहण सोहळ्याच्या आयोजनात धार्मिक विधी करणारे गुरुजी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले आहेत. शुक्रवारी झालेल्या ग्रामप्रदक्षिणा सोहळ्यात रामकुंड परिसरातील दशक्रिया विधी आणि उत्तरकार्य करणारे गुरुजी सहभागी झाले. सत्यनारायण पूजा, कलशपूजन, गृहप्रवेश यांसारखे विधी करणारे गुरुजीही सोहळ्याच्या नियोजनात व्यग्र असल्याने काही यजमानांना आपल्या पूजाविधींसाठी दोन दिवस प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही विधी पुढे ढकलण्याची विनंती यजमानांना करण्यात येत आहे. या सोहळ्यासाठी राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील अनेक मंत्री नाशिकमध्ये उपस्थित राहणार आहेत.

'व्हीआयपीं'च्या स्वागतासाठी नाशिक सज्ज

महाध्वजारोहण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहराला धार्मिक आणि सांस्कृतिक सजावट करण्यात आली आहे. शहरातील प्रमुख मार्गांवर भगवे ध्वज, पताका आणि स्वागताची प्रतीके लावण्यात आली आहेत. रामकुंड, तपोवन आणि त्र्यंबकेश्वर परिसरातही उत्सवी वातावरण निर्माण झाले आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीची अधिकृत सुरुवात दर्शवणारा हा सोहळा नाशिकच्या धार्मिक परंपरेच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. राष्ट्रपतींसह देश आणि राज्यातील मान्यवरांच्या उपस्थितीत होणारा हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासनाची कसोटी लागणार आहे.

"उपमुख्यमंत्री शिंदे येत्या काळात मुख्यमंत्री होणार नाहीत"; सदावर्तेंचे खळबळजनक विधान

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अलीकडील एका कार्यक्रमातील एकत्रित उपस्थितीवरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असतानाच, ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते यांनी या घडामोडीवर सकारात्मक भाष्य केले आहे. "कालच्या कार्यक्रमात हे तिन्ही नेते ऑरगॅनिक राजकारणी वाटत होते. तो एक नैसर्गिक कार्यक्रम होता. महाराष्ट्राने यातून वेगळा आदर्श घेतला," अशी प्रतिक्रिया त्यांनी पत्रकार परिषदेत दिली. ग्रंथाली संस्थेने आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे कौतुक करताना सदावर्ते म्हणाले की, महाराष्ट्राला समृद्ध सांस्कृतिक ठेवा लाभला आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची गरज आहे. ग्रंथालीने असा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल त्यांनी संस्थेला सलाम केला.

राजकीय मतभेद असले तरी सामाजिक आणि सांस्कृतिक व्यासपीठावर नेत्यांनी एकत्र येणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. "राज ठाकरे यांचे राजकारण काही पाकिस्तानी नाही. व्यक्ती म्हणून माझे त्यांच्याशी कोणतेही वैयक्तिक भांडण नाही. काही मुद्द्यांवर विरोधी भाष्य करावे लागते; मात्र राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार केला पाहिजे," असेही सदावर्ते म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी आगामी दिवाळीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आपल्या घरी आमंत्रित करावे, असे मत व्यक्त करताना त्यांनी राजकीय संवादाचे समर्थन केले. "एकनाथ शिंदेंचे राजकारण संकरित" उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकारणावर टीका करताना सदावर्ते यांनी 'संकरित राजकारण'



असा शब्दप्रयोग केला. "कोणत्याही परिस्थितीत संकरित पद्धतीचे राजकारण नको. राजकारणात काही गोष्टी एका वेळेपुरत्या असतात. राजकारणाच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची गरज आहे," असे ते म्हणाले. संजय शिरसाट यांच्या वक्तव्यांवर प्रतिक्रिया देताना त्यांनी, "शिरसाट काय म्हणतात, ते त्यांचे वैयक्तिक प्रेम आहे. मात्र डंके की चोट पर सांगतो, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे येत्या काळात मुख्यमंत्री होणार नाहीत," असे ठाम विधान केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय चर्चेला नवा विषय मिळाला आहे. पूर्णेकर कुटुंबाच्या प्रकरणावर पोलिसांना आवाहन पूर्णेकर कुटुंबाशी संबंधित प्रकरणाचा उल्लेख करत सदावर्ते यांनी पोलिसांनी कोणतीही हयगय करू नये, असे आवाहन केले. या प्रकरणात काही व्यक्ती किंवा अधिकाऱ्यांबाबत आपल्याला शंका असल्याचे त्यांनी सूचित केले. मात्र संबंधित व्यक्ती किंवा अधिकाऱ्यांची भूमिका आणि आरोपांची सत्यता अधिकृत तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे. भाजपचे नवनाथ बन यांच्याबाबत बोलताना सदावर्ते यांनी त्यांच्याशी जवळीक असल्याचे सांगितले. तसेच टीका करताना मर्यादा पाळण्याचा इशाराही दिला. "लायकी काढली तर लायकीत राहावे लागेल," अशा शब्दांत त्यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. संजय गायकवाड यांच्या वक्तव्यावरही टीका शेतकऱ्यांबाबत संजय गायकवाड यांनी केलेल्या वक्तव्यावर सदावर्ते यांनी नाराजी व्यक्त केली. "शेतकऱ्यांबद्दल असे बोलणे किती दलबद्री आहे? ही कोणती विचारधारा आहे?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संबंधित वक्तव्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी राजकीय विचारधारेवरही टीका केली. एकूणच, सदावर्ते यांनी एका बाजूला फडणवीस, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्रित उपस्थितीचे कौतुक केले, तर दुसऱ्या बाजूला एकनाथ शिंदे यांच्या राजकारणावर टीका आणि त्यांच्या मुख्यमंत्रीपदाबाबत ठाम भाकीत केले. त्यांच्या या वक्तव्यांमुळे महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात नव्या चर्चेला सुरुवात होण्याची शक्यता आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या अलीकडील एका कार्यक्रमातील एकत्रित उपस्थितीवरून राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असतानाच, ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते यांनी या घडामोडीवर सकारात्मक भाष्य केले आहे. "कालच्या कार्यक्रमात हे तिन्ही नेते ऑरगॅनिक राजकारणी वाटत होते. तो एक नैसर्गिक कार्यक्रम होता. महाराष्ट्राने यातून वेगळा आदर्श घेतला," अशी प्रतिक्रिया त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

होम पिचवरील पराभव देवेंद्र फडणवीसांच्या जिव्हारी

जन सम्राट टाईम्स

नागपूर। प्रतिनिधी: नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपला सलग दुसऱ्यांदा पराभवाचा सामना करावा लागल्याने पक्षांतर्गत आत्मपरीक्षणाला सुरुवात झाली आहे. विशेष म्हणजे, या मतदारसंघात समाविष्ट असलेल्या सहा जिल्ह्यांमध्ये महायुतीचे मोठे राजकीय संख्याबळ असतानाही भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे यांना विजय मिळवता आला नाही. त्यामुळे एवढे आमदार, खासदार आणि विधानपरिषदेचे सदस्य सोबत असतानाही महायुतीची ताकद मतांमध्ये का उतरली नाही, असा सवाल उपस्थित केला जात आहे. या पराभवाबाबत प्रदेश पातळीवरील पदाधिकाऱ्यांकडेही विचारणा करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. नागपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, भंडारा आणि चंद्रपूर या सहा जिल्ह्यांचा नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात समावेश आहे. या सहा जिल्ह्यांमध्ये विधानसभेचे एकूण ३२ आमदार असून, त्यापैकी २६ आमदार महायुतीचे आहेत. यामध्ये एकट्या भाजपचे २१ आमदार आहेत. याशिवाय विधानपरिषदेचे पाच सदस्य आणि राज्यसभेचे दोन खासदार असे राजकीय पाठबळही महायुतीकडे आहे. एवढे मोठे संख्याबळ असूनही पदवीधर



मतदारांनी भाजपच्या बाजूने कौल दिला नाही. त्यामुळे स्थानिक पातळीवरील संघटनात्मक कामकाज आणि निवडणुकीच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण होतो. अखेर 50 तासांनी निकाल लागला! मोदींच्या होमपीचवर भाजपला जबर झटका; डबल इंजिन असताना दारुण पराभव मी आणि मुलगी घर सोडून निघालेलो, तो फक्त बघत बसलेला, त्याला त्याच्या आईसोबत राहायचं होतं! अरुण कदम यांच्या पत्नीने सांगितली आठवण आदित्य ठाकरेंना अटक करा म्हणणाऱ्या म्हस्केंबाबत गौप्यस्फोट; एकनाथ शिंदेंना शिवीगाळ केल्याचा दावा आदित्य ठाकरेंची ठाण्यात तुफान गर्दी; नरेश म्हस्केंच्या आव्हानानंतर राऊत, अविनाश जाधव मैदानात तुकाराम मुंढे यांनी पुढे म्हटलं की, याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार ज्यांना आहे, अशा सहआयुक्तांना हे प्रकरण देण्यात येणार असून पुढील आठवड्यापर्यंत हे प्रकरण त्यांच्याकडे जाईल. त्यानंतर सहआयुक्तांसमोर याप्रकरणी कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात येईल. याप्रकरणी अभिनेते अजय देवगण यांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली असून याचिका दाखल केली आहे, अशी माहितीही मुंढे यांनी दिली आहे. या तीनही अभिनेत्यांवर जाहिरातींमध्ये उत्पादनाचे कथित चुकीचे सादरीकरण केल्याचा आरोप आहे. काय आहे एफडीएचं म्हणणं? विमल इलायचीची जाहिरात वरकरणी जाहिरात स्वरूपात असल्याचे दाखवण्यात येत असले, तरीही या ब्रँडचा संबंध पान मसाल्याशी निगडित आहे. त्या अनुषंगाने एफडीएकडून अभिनेत्यांना ऑगस्ट महिन्यात नोटीस पाठवण्यात आली होती. राज्यात पान मसाल्याच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर संबंधित प्रतिबंध लागू असल्याचे नोटिशीत स्पष्ट केले होती. अशा प्रकारे जाहिरात करण्यावर निर्बंध आहेत. नोटिशीत काय म्हटलं होतं? 'विमल पान मसाला/इलायची जाहिरातींमधील सहभाग, उत्पादनाचे समर्थन त्वरित थांबवण्यात यावे,' असे नोटिशीत स्पष्ट केले होते. 'त्यांच्या अधिकृत सोशल मीडियावरून संबंधित जाहिरात, प्रचारात्मक मजकूर हटवावा किंवा त्याचा प्रसार थांबवावा. भविष्यात या जाहिरातीचे प्रसारण, प्रकाशन वा प्रचारासाठी कोणतेही सहकार्य करू नये, विमल इलायची हे स्वतंत्र उत्पादन आहे, की विमल पान मसाला/तंबाखू उत्पादनाच्या ब्रँड विस्ताराची जाहिरात आहे याविषयी कागदपत्रे सादर करावीत,' असेही यात नमूद करण्यात आले होते.

कापूस विक्री होणार अधिक पारदर्शक

खामगाव: कापूस खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राखणे, शेतकऱ्यांना डिजीटल सुविधांची माहिती देणे आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कापसाची उत्पादकता वाढविण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने भारतीय कापूस महामंडळाच्या वतीने शेतकरी जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.सप्ताहांतर्गत बुधवारी खामगाव येथील औदार्या ॲग्रो इंडस्ट्रीज येथे हे शिबिर पार पडले. या उपक्रमातून कापूस खरेदी प्रक्रियेतील पारदर्शकता, डिजीटल सुविधांचा वापर आणि आधुनिक लागवड तंत्रज्ञानाविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

उजनी धरणात विकासाची नवी क्रांती!

जन सम्राट टाईम्स



सोलापूर | प्रतिनिधी: उजनी धरण परिसरातील प्रस्तावित फ्लोटिंग सोलार, बॅटरी स्टोरेज आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित डेटा सेंटर प्रकल्पामुळे सोलापूरच्या औद्योगिक आणि आर्थिक विकासाला नवी दिशा मिळणार आहे. या प्रकल्पातून दोन हजार मेगावॅट वीजनिर्मिती, २८०० कायमस्वरूपी आणि सुमारे ४० हजार प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे. उजनीच्या एकूण जलक्षेत्रापैकी केवळ नऊ टक्के क्षेत्रावर सौर प्रकल्प उभारण्यात येणार असून, उर्वरित ९१ टक्के जलाशय खुला राहणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिली. प्रकल्पाबाबत पाणीवापर, शेतकऱ्यांचे नुकसान, विस्थापन, मासेमारी आणि पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांविषयी विविध शंका उपस्थित होत आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने प्रकल्पाचे स्वरूप आणि नागरिकांच्या शंकांबाबत स्पष्टीकरण दिले आहे. राज्य शासनाने १६ एप्रिल २०२६ रोजी या प्रकल्पासाठी सामंजस्य करार केला आहे.प्रकल्पांतर्गत दोन हजार मेगावॅट क्षमतेचा फ्लोटिंग सोलार प्रकल्प, १८०० मेगावॅट क्षमतेची बॅटरी साठवणूक व्यवस्था आणि १.४ गिगावॅट क्षमतेचे अत्याधुनिक डेटा सेंटर प्रस्तावित आहे. सौरऊर्जेतून निर्माण होणारी वीज डेटा सेंटरसाठी वापरली जाणार असून, अतिरिक्त वीज बॅटरीमध्ये साठवली जाणार आहे. उजनीच्या ३३ हजार ६३० हेक्टर जलक्षेत्रापैकी तीन हजार हेक्टरवर सौर प्रकल्प उभारण्यात येणार आहे. प्रकल्पासाठी सहा टीएमसी पाणी लागणार असल्याची चर्चा चुकीची असून, प्रत्यक्षात वार्षिक ०.४२ टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. कमाल वापर ०.५ टीएमसीपर्यंत राहणार आहे. विद्यमान पाणीवाटप व्यवस्थेत कोणतीही कपात केली जाणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. डेटा सेंटरमध्ये पाण्याचा वापर मर्यादित ठेवण्यासाठी आधुनिक बंदिस्त शीतकरण तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. तसेच फ्लोटिंग सोलारमुळे बाष्पीभवन ३० ते ७० टक्क्यांपर्यंत कमी होऊन वर्षाला सुमारे १.५ टीएमसी पाण्याची बचत अपेक्षित आहे.भीमानगरमधील नागरिकांचे विस्थापन होणार नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जलसंपदा विभागाच्या जागेत वास्तव्यास असलेल्या ३११ कुटुंबांसाठी ५१.१८ एकर क्षेत्र विनामोबदला उपलब्ध करून देण्यात आले आहे. गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित असलेला जागेचा प्रश्न यामुळे मार्गी लागणार आहे. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी भीमानगर-रांझणी, तरटगाव आणि हिंगणगाव येथील एकूण ४१५.७५ एकर शासकीय जमिनीचा वापर प्रस्तावित आहे. याव्यतिरिक्त खासगी जमिनीचे नव्याने संपादन केले जाणार नसल्याचे प्रशासनाने सांगितले. उजनी परिसरात ग्रीन हायड्रोजन किंवा स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर (अणुऊर्जा प्रकल्प) उभारण्याचे कोणतेही नियोजन नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

तुकाराम मुंढेंचा बॉलिवूडच्या दिग्गजांना दणका!

शाहरूख खानसह अजय देवगण आणि टायगर श्रॉफने नियमांचं उल्लंघन केल्याचं स्पष्ट

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान याच्यासह अभिनेता अजय देवगण , टायगर श्रॉफ यांना 'विमल इलायची'ची जाहिरात केल्याप्रकरणी महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) काही महिन्यांपूर्वी नोटीस बजावली होती. याप्रकरणी आता महत्त्वाची माहिती समोर आली असून तिन्ही अभिनेत्यांनी जाहिरात करताना नियमांचं उल्लंघन केल्याचं समोर आलं आहे.

अशी माहिती आज अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिली आहे. अभिनेत्यांवरील कारवाईबाबत पत्रकार परिषदेत माहिती देताना तुकाराम मुंढे म्हणाले की, "जाहिरात आणि दाव्यांबाबत आपण तीन अभिनेत्यांना जी नोटीस पाठवली होती, त्याबाबत आपण त्यांचं सर्व म्हणणं ऐकून घेतलं आहे. हे म्हणणं ऐकून घेतल्यानंतर ज्यांनी याबाबतची नोटीस पाठवली होती त्या सहाय्यक आयुक्तांनी याबाबत आपलं निरीक्षण नोंदवलं आहे. या अभिनेत्यांनी जाहिरात करताना नियमांचं उल्लंघन केल्याचं निदर्शनास आलं आहे.

," अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली आहे. त्यामुळे शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांच्यावर याप्रकरणी कायदेशीर कारवाई होणार, हे आता जवळपास निश्चित झालं आहे. अखेर 50 तासांनी निकाल लागला! मोदींच्या होमपीचवर भाजपला जबर झटका; डबल इंजिन असताना दारुण पराभव



मी आणि मुलगी घर सोडून निघालेलो, तो फक्त बघत बसलेला, त्याला त्याच्या आईसोबत राहायचं होतं! अरुण कदम यांच्या पत्नीने सांगितली आठवण आदित्य ठाकरेंना अटक करा म्हणणाऱ्या म्हस्केंबाबत गौप्यस्फोट; एकनाथ शिंदेंना शिवीगाळ केल्याचा दावा आदित्य ठाकरेंची ठाण्यात तुफान गर्दी; नरेश म्हस्केंच्या आव्हानानंतर राऊत, अविनाश जाधव मैदानात तुकाराम मुंढे यांनी पुढे म्हटलं की, याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार ज्यांना आहे, अशा सहआयुक्तांना हे प्रकरण देण्यात येणार असून पुढील आठवड्यापर्यंत हे प्रकरण त्यांच्याकडे जाईल. त्यानंतर सहआयुक्तांसमोर याप्रकरणी कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात येईल. याप्रकरणी अभिनेते अजय देवगण यांनी मुंबई हायकोर्टात धाव घेतली असून याचिका दाखल केली आहे, अशी माहितीही मुंढे यांनी दिली आहे. या तीनही अभिनेत्यांवर जाहिरातींमध्ये उत्पादनाचे कथित चुकीचे सादरीकरण केल्याचा आरोप आहे. काय आहे एफडीएचं म्हणणं? विमल इलायचीची जाहिरात वरकरणी जाहिरात स्वरूपात असल्याचे दाखवण्यात येत असले, तरीही या ब्रँडचा संबंध पान मसाल्याशी निगडित आहे. त्या अनुषंगाने एफडीएकडून अभिनेत्यांना ऑगस्ट महिन्यात नोटीस पाठवण्यात आली होती. राज्यात पान मसाल्याच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर संबंधित प्रतिबंध लागू असल्याचे नोटिशीत स्पष्ट केले होती. अशा प्रकारे जाहिरात करण्यावर निर्बंध आहेत. नोटिशीत काय म्हटलं होतं? 'विमल पान मसाला/इलायची जाहिरातींमधील सहभाग, उत्पादनाचे समर्थन त्वरित थांबवण्यात यावे,' असे नोटिशीत स्पष्ट केले होते. 'त्यांच्या अधिकृत सोशल मीडियावरून संबंधित जाहिरात, प्रचारात्मक मजकूर हटवावा किंवा त्याचा प्रसार थांबवावा. भविष्यात या जाहिरातीचे प्रसारण, प्रकाशन वा प्रचारासाठी कोणतेही सहकार्य करू नये, विमल इलायची हे स्वतंत्र उत्पादन आहे, की विमल पान मसाला/तंबाखू उत्पादनाच्या ब्रँड विस्ताराची जाहिरात आहे याविषयी कागदपत्रे सादर करावीत,' असेही यात नमूद करण्यात आले होते.

महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा धुमाकूळ!

नाशिकपासून मुंबई-पुण्यापर्यंत पावसाची हजेरी; शेतकऱ्यांच्या चिंतेत भर

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी : राज्यातील अनेक भागांत अवकाळी पावसाने अचानक हजेरी लावत नागरिकांची धावपळ उडवली आहे. नाशिक, ठाणे, शहापूर, पिंपरी-चिंचवड आणि मुंबईसह विविध भागांत पावसाच्या सरी बरसल्याने वातावरणात बदल झाला आहे. काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे जनजीवनावर परिणाम झाला, तर काही भागांत उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला. मात्र, आधीच नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हा पाऊस दिलासा आणि चिंता अशा दोन्ही भावना घेऊन आला आहे. नाशिक जिल्ह्यात चांदवड, लासलगावमध्ये जोरदार पाऊस नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यात गेल्या दोन तासांपासून मुसळधार पाऊस सुरू असल्याची माहिती आहे. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिक आणि शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना या पावसाने काहीसा दिलासा दिला आहे. लासलगाव परिसरातही सुमारे तासभर पावसाची संततधार सुरू होती. सिन्नर परिसरातही अवकाळी पावसाने हजेरी लावली. वाढत्या उकाड्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना पावसामुळे गारवा अनुभवायला मिळाला. मात्र, पिकांच्या अवस्थेनुसार या पावसाचा शेतीवर काय परिणाम होतो, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यात अवकाळी पावसामुळे भातशेतीचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. पावसाअभावी आधीच सुकलेल्या भातपिकांना आता अवकाळी पावसाचा फटका बसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली



आहे. एकीकडे पावसाअभावी पिकांची अवस्था बिकट झाली होती, तर दुसरीकडे अचानक झालेल्या पावसामुळे उर्वरित पिकांचेही नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे शहापूर तालुका दुष्काळग्रस्त घोषित करावा, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून केली जात आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये मुसळधार सरी; नागरिकांची धावपळ पिंपरी-चिंचवड शहरातही पावसाने जोरदार हजेरी लावली. अचानक सुरू झालेल्या पावसामुळे कामानिमित्त बाहेर पडलेल्या नागरिकांची धावपळ उडाली. शहरातील विविध भागांत पावसाचा जोर जाणवला. पावसामुळे वाहतूक आणि दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. महिनाभरानंतर मुंबईत पाऊस; उकाड्यापासून दिलासा मुंबईत जवळपास महिनाभराच्या विश्रांतीनंतर पावसाने पुन्हा हजेरी लावली. दादर परिसरात पावसाच्या सरी बरसताच नागरिकांची पळापळ झाली. मात्र, गेल्या काही दिवसांपासून उकाड्याने हैराण झालेल्या मुंबईकरांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला. ठाणे शहरातही ढगाळ वातावरणासह रिमझिम पाऊस झाला. शेतकऱ्यांसाठी दिलासा की नव्या संकटाची चाहूल? राज्यातील काही भागांत पावसामुळे दुष्काळसदृश परिस्थितीतून काहीसा दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली असली, तरी शहापूरसारख्या भागांत पिकांच्या नुकसानीच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे अवकाळी पावसाचा शेतीवर होणारा नेमका परिणाम स्पष्ट होण्यासाठी प्रत्यक्ष पंचनामे आणि कृषी विभागाच्या पाहणीची गरज आहे. दरम्यान, अर्णब चक्रीवादळामुळे वातावरणात बदल झाल्याची चर्चा असली, तरी या पावसामागील नेमके हवामानशास्त्रीय कारण अधिकृत हवामान विभागाच्या माहितीनंतरच स्पष्ट होणार आहे. एकूणच राज्यात अवकाळी पावसाने कुठे दिलासा, तर कुठे नुकसानीची चिंता निर्माण केली असून शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष पुढील हवामानाकडे लागले आहे. राज्यातील अनेक भागांत अवकाळी पावसाने अचानक हजेरी लावत नागरिकांची धावपळ उडवली आहे. नाशिक, ठाणे, शहापूर, पिंपरी-चिंचवड आणि मुंबईसह विविध भागांत पावसाच्या सरी बरसल्याने वातावरणात बदल झाला आहे. काही ठिकाणी मुसळधार पावसामुळे जनजीवनावर परिणाम झाला,. नाशिक जिल्ह्यात चांदवड, लासलगावमध्ये जोरदार पाऊस नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालुक्यात गेल्या दोन तासांपासून मुसळधार पाऊस सुरू असल्याची माहिती आहे. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिक आणि शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. दुष्काळसदृश परिस्थितीमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांना या पावसाने काहीसा दिलासा दिला आहे.

संपादकीय

सिंहस्थाचा महाध्वज उंचावणार; पण सामान्य माणसाच्या अपेक्षांचे काय?

नाशिक ही केवळ महाराष्ट्राची धार्मिक नगरी नाही, तर श्रद्धा, संस्कृती, परंपरा आणि अध्यात्म यांचा शतकानुशतकांचा वारसा जपणारी भूमी आहे. गोदावरीच्या तीरावर वसलेल्या या नगरीला सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने देशाच्या धार्मिक नकाशावर विशेष स्थान प्राप्त होते. २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आज, ३१ ऑक्टोबर रोजी पार पडणारा महाध्वजारोहण सोहळा हा त्याच परंपरेचा महत्त्वपूर्ण प्रारंभबिंदू ठरणार आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह राज्यातील अनेक मंत्र्यांची उपस्थिती या सोहळ्याचे महत्त्व अधोरेखित करते. सुमारे दीड हजार व्हीआयपींच्या उपस्थितीमुळे नाशिकमध्ये प्रशासकीय आणि सुरक्षा यंत्रणांची मोठी लगबग सुरू आहे. शहर भगव्या पताका, ध्वज आणि स्वागताच्या सजावटीने नटले आहे. मात्र या भव्यतेच्या पलीकडे काही मूलभूत प्रश्न उभे राहतात. सिंहस्थाचा महाध्वज उंचावताना सामान्य नागरिकांच्या अपेक्षांचा ध्वजही तितक्याच उंचीवर नेला जाणार आहे का? कुंभमेळा हा केवळ धार्मिक कार्यक्रम नाही. तो भारतीय समाजजीवनातील सामूहिक श्रद्धेचा, सांस्कृतिक एकात्मतेचा आणि आध्यात्मिक परंपरेचा विराट आविष्कार आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून साधू-संत, महंत, आखाडे, भाविक आणि पर्यटक या पर्वात सहभागी होतात. लाखो लोकांची पावले नाशिक आणि त्र्यंबकेश्वरकडे वळतात. त्यामुळे या सोहळ्याचे नियोजन हे एखाद्या दिवसाच्या कार्यक्रमापुरते मर्यादित ठेवता येणार नाही. महाध्वजारोहण हा आगामी सिंहस्थाचा शुभारंभ असला, तरी त्यातून प्रशासनाच्या तयारीची, दूरदृष्टीची आणि कार्यक्षमतेची पहिली झलक दिसली पाहिजे. आजच्या सोहळ्यातील नियोजन हे उद्याच्या कुंभमेळ्याच्या व्यवस्थापनाचा आरसा ठरणार आहे. राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियंत्रण, निवास, स्वागत आणि आपत्कालीन व्यवस्थापनाला प्राधान्य देणे स्वाभाविक आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी शुक्रवारी रात्रीच नाशिकमध्ये दाखल होऊन तयारीचा आढावा घेतल्याने प्रशासनाला महत्त्वाच्या सूचना मिळाल्या असतील. परंतु एका प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. मोठ्या मान्यवरांच्या दौऱ्यासाठी प्रशासन ज्या वेगाने यंत्रणा हलवते, त्याच तत्परतेने सामान्य भाविकांच्या प्रश्नांवर काम होते का? व्हीआयपींच्या वाहनांसाठी मार्ग मोकळे केले जातात; मग रुग्णवाहिका, स्थानिक नागरिक, व्यापारी आणि भाविकांच्या वाहतुकीसाठी स्वतंत्र आणि परिणामकारक व्यवस्था कितपत तयार आहे? सुरक्षेच्या नावाखाली नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची जबाबदारीही प्रशासनाचीच आहे. धार्मिक सोहळ्याचे खरे केंद्र साधू-संत आणि महंत आहेत. कुंभमेळ्याच्या परंपरेत आखाडे, संतसमुदाय आणि धार्मिक संस्थांचे योगदान अनन्यसाधारण आहे. त्यामुळे त्यांच्या भावना, अपेक्षा आणि सूचनांना नियोजनात अग्रक्रम मिळणे आवश्यक आहे. मात्र या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर काही साधू-महंतांमध्ये नाराजी असल्याचे चित्र समोर येत आहे. ही बाब केवळ किरकोळ मतभेद म्हणून बाजूला सारता येणार नाही. धार्मिक परंपरेचा गाभा ज्या संतसमुदायाशी जोडलेला आहे, त्यांच्यातच असमाधान असेल तर प्रशासनाने त्याची कारणे समजून घेतली पाहिजेत. संवादाऐवजी केवळ आदेश, बैठका आणि प्रसिद्धी यांवर भर दिल्यास विश्वासाचे वातावरण निर्माण होणार नाही. कुंभमेळा हा सरकारचा कार्यक्रम नसून समाजाचा आणि संतपरंपरेचा उत्सव आहे, याचे भान प्रत्येक यंत्रणेने ठेवले पाहिजे. या सोहळ्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे नाशिकमधील पुरोहित वर्ग आणि स्थानिक धार्मिक अर्थव्यवस्था. ग्रामप्रदक्षिणा सोहळ्यात रामकुंड परिसरातील दशक्रिया विधी, उत्तरकार्य, सत्यनारायण पूजा, कलशपूजन आणि गृहप्रवेश यांसारखे विधी करणारे गुरुजी सहभागी झाले. परिणामी अनेक पूजाविधी पुढे ढकलण्याची वेळ यजमानांवर येत असल्याचे चित्र आहे. नवीन घर खरेदी केलेल्या कुटुंबांना गृहप्रवेशासाठी प्रतीक्षा करावी लागणे किंवा ठरवलेले धार्मिक विधी पुढे ढकलावे लागणे, ही सामान्य बाब वाटू शकते; परंतु त्यामागे नागरिकांचे नियोजन, खर्च आणि भावनिक अपेक्षा गुंतलेल्या असतात. धार्मिक सोहळ्याच्या आयोजनात स्थानिक पुरोहित, लहान व्यावसायिक, दुकानदार आणि सेवा पुरवठादार यांचाही सहभाग महत्त्वाचा असतो. त्यांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होणार असेल तर त्यासाठी पर्यायी व्यवस्था आणि पूर्वसूचना देणे आवश्यक आहे.

जळगाव जिल्हा बँक निवडणुकीत महायुतीतच संघर्ष!

"महायुतीत मिठाचा खडा पडला तर मी काय करू?"

जन सम्राट टाईम्स

जळगाव। प्रतिनिधी : जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत महायुतीमधील भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यातील अंतर्गत मतभेद उघडपणे समोर आले आहेत. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांच्याविरोधात मुक्ताईनगर तालुक्यात शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. यावर प्रतिक्रिया देताना शिंदेसेनेचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी थेट आव्हान देत, "माझ्याविरुद्ध कोणी निवडणूक लढवणार असेल, तर मी त्याला कसं काय लढू देईन? महायुतीमध्ये मिठाचा खडा पडला तर मी काय करू?" असा सवाल केला. मात्र, महायुतीतील वरिष्ठ नेत्यांनी आदेश दिल्यास उमेदवारी अर्ज मागे घेण्याची आणि रक्षा खडसे यांचा प्रचार करण्याची तयारीही आमदार पाटील यांनी दर्शवली. "मंत्री गुलाबराव पाटील आणि मंत्री गिरीश महाजन यांचे आदेश आले, तर अर्ज मागे घेऊ आणि रक्षा खडसे यांचा प्रचार करू," असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे मुक्ताईनगरमधील उमेदवारीचा पेच आता वरिष्ठ





नेत्यांच्या भूमिकेवर अवलंबून असल्याचे चित्र आहे. तीन जागा बिनविरोध; शिंदेसेनेच्या दोन, भाजपची एक जागा दरम्यान, जळगाव जिल्हा बँकेच्या निवडणुकीत महायुतीला तीन जागांवर बिनविरोध यश मिळाले आहे. पारोळा, एरंडोल आणि भुसावळ विकास संस्था मतदारसंघांत अन्य उमेदवारी अर्ज दाखल न झाल्याने या जागा बिनविरोध झाल्या आहेत. पारोळा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाच्या नलिनी चिमणराव पाटील, तर एरंडोल मतदारसंघातून मृणाल अमोल पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. विशेष म्हणजे, शिंदेसेनेचे आमदार अमोल पाटील यांच्या आई आणि पत्नी या दोघीही जिल्हा बँकेच्या निवडणुकीत बिनविरोध निवडून आल्या आहेत. भुसावळ मतदारसंघातून भाजपचे मंत्री संजय सावकारे यांच्या पत्नी रजनी संजय सावकारे यांची बिनविरोध निवड झाली आहे. अशा प्रकारे तीन जागांपैकी दोन जागा शिंदेसेनेच्या, तर एक जागा भाजपच्या वाट्याला गेली आहे. जागावाटपावरून आधीपासूनच तिढा निवडणुकीत भाजप आणि शिवसेना शिंदे गटामध्ये जागावाटपावरून सुरुवातीपासूनच मतभेद होते. जागावाटपाचे सूत्र निश्चित झाल्याचे सांगितले जात असताना शिवसेनेच्या जागांबाबत मात्र अनिश्चितता कायम होती. भाजप आमदार मंगेश चव्हाण यांनीही यासंदर्भात भूमिका मांडली होती. संभाव्य राजकीय पेच लक्षात घेऊन भाजप आणि शिवसेना शिंदे गटाकडून खबरदारी म्हणून अनेक मतदारसंघांत उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. महायुतीची बैठक होऊनही काही जागांवरील तिढा कायम राहिल्याचे चित्र दिसले. शिंदेसेनेकडून अधिक जागांची मागणी होत असल्याने जागावाटपात अडचणी निर्माण झाल्याचे आमदार मंगेश चव्हाण यांनी यापूर्वी सांगितले होते. केवळ जागावाटपच नव्हे, तर जिल्हा बँकेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या सूत्रावरही भाजप आणि शिवसेनेत एकमत झाले नसल्याची चर्चा आहे. यासंदर्भातील अंतिम निर्णय मंत्री गिरीश महाजन आणि मंत्री गुलाबराव पाटील घेणार असल्याचेही सांगण्यात आले होते. वरिष्ठांच्या निर्णयाकडे लक्ष एकीकडे तीन जागा बिनविरोध झाल्याने महायुतीला दिलासा मिळाला असला, तरी मुक्ताईनगरमध्ये रक्षा खडसे यांच्याविरोधात शिंदेसेनेच्या कार्यकर्त्यांनी अर्ज दाखल केल्याने महायुतीतील समन्वयाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आमदार चंद्रकांत पाटील यांनी वरिष्ठांच्या आदेशानुसार माघार घेण्याची तयारी दर्शवली असली, तरी प्रत्यक्षात उमेदवारी अर्ज मागे घेतले जातात का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत स्थानिक राजकीय समीकरणे, नेत्यांचे वर्चस्व आणि महायुतीतील जागावाटप यांची कसोटी लागणार असल्याचे या घडामोडींवरून स्पष्ट होत आहे.

नगरपंचायतीच्या नोटिशीला ठेकेदाराची केराची टोपली!

जन सम्राट टाईम्स

देहूगाव | प्रतिनिधी : भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्पाचे काम करताना इंद्रायणी नदीपात्रात टाकण्यात आलेला राडारोडा अद्याप हटविण्यात आलेला नसल्याचे उघड झाले आहे. देहू नगरपंचायतीने संबंधित जावळे कन्स्ट्रक्शनला राडारोडा हटवून नदीपात्र पूर्ववत करण्याची नोटीस बजावली होती. मात्र, त्यानंतरही नदीपात्रातील राडारोडा कायम असल्याचे सध्या नदीचे पाणी आटल्याने दिसून येत आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदारावर नगरपंचायतीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. देहू नगरपंचायत हद्दीतील साई चौक ते वडाचा माळदरम्यान असलेल्या पुलाजवळ भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्पांतर्गत पाइपलाइन टाकण्याचे काम जावळे कन्स्ट्रक्शनला देण्यात आले होते. हे काम सुरू असताना नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर माती, गोटे आणि मुरूम टाकण्यात आला होता. तसेच, जेसीबीच्या साहाय्याने नदीपात्रात खोलवर खोदकाम करण्यात आले होते.पाइपलाइन टाकण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर नदीपात्रात टाकलेला राडारोडा आणि बांधकामातील अवशेष पूर्णपणे हटविणे आवश्यक होते.मात्र,संबंधित ठेकेदाराने केवळ काही प्रमाणात माती काढून तिचे ढीग नदीकाठावर ठेवले. नदीपात्रातील संपूर्ण माती आणि अन्य अवशेष हटविण्यात आले नसल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे नदीचे पाणी आटल्यावर नदीपात्रातील राडारोडा उघडपणे दिसू लागला आहे.नदीपात्रात टाकण्यात आलेल्या राडारोड्यामुळे इंद्रायणी नदीच्या नैसर्गिक प्रवाहात बदल होत असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. परिणामी, येलवाडी परिसरातील शेतजमिनीत पाणी शिरत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याची तक्रार आहे. जून महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे इंद्रायणी नदीला महापूर आला होता. या पुराच्या पाण्यामुळे नदीकाठावर टाकलेली माती पुन्हा वाहून नदीपात्रात मिसळल्याचेही दिसून आले. त्यामुळे नदीपात्रातील राडारोडा हटविण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.इंद्रायणी नदीपात्रातील राडारोडा, बांधकाम साहित्य आणि अन्य अवशेष तातडीने हटवून नदीपात्र स्वच्छ करण्याचे निर्देश देहू नगरपंचायतीने संबंधित ठेकेदाराला २४ जून २०२६ रोजी नोटीसद्वारे दिले होते. नोटीस मिळाल्यापासून दोन दिवसांच्या आत काम पूर्ण करून, केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल छायाचित्रांसह नगरपंचायतीकडे सादर करण्याचे आदेशही देण्यात आले होते.

शिक्षकांनी निपुण विद्यार्थी घडवावेत; वर्ग व्यवस्थापनासह पालकांच्या सहभागावर भर!

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद। प्रतिनिधी : वर्ग व्यवस्थापन, शिक्षकांचे सकारात्मक विचार, पालकांचा सक्रिय सहभाग आणि अधिकाऱ्यांचे योग्य मार्गदर्शन या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. शिक्षकांनी या सर्व बाबींचा समन्वय साधून निपुण विद्यार्थी घडवावेत, असे प्रतिपादन जळगाव डायटचे प्राचार्य डॉ. अनिल झोपे यांनी केले. नशिराबाद केंद्राची शिक्षण परिषद बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषद केंद्रशाळा, नशिराबाद येथे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेला डायटचे प्राचार्य डॉ. अनिल झोपे यांनी भेट देऊन उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले. केंद्रप्रमुख राहुल संसारे यांनी पुस्तक भेट देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी ज्ञानप्रकाश फाउंडेशनचे सागर धनेधर उपस्थित होते. शिक्षण परिषदेचे प्रास्ताविक रेखा खारे यांनी केले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा केंद्रप्रमुख राहुल संसारे यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस



पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी 'होऊ यशवंत आम्ही होऊ गुणवंत' या गीतातून उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. परिषदेत 'निपुण महाराष्ट्र अभियान : शाळानिहाय प्रगतीचा आढावा आणि प्रशासकीय विषय' या विषयावर केंद्रप्रमुख राहुल संसारे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी शाळास्तरावर नियोजनबद्ध प्रयत्न करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.'
वर्ग व मासिक नियोजन' या विषयावर मंजू बारी आणि सुचिता वासनिक यांनी शिक्षकांचा कृतीयुक्त सहभाग घेत प्रभावी सादरीकरण केले. तसेच जयश्री कांबळे, मीना गुळवे आणि वंदना बागुल यांनी शिक्षकांना 'मूल्यवर्धन (उजळणी प्रशिक्षण)' दिले. या सत्रातून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी शिक्षकांनी कोणते उपक्रम राबवावेत, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. रांगोळीतून मूल्यांची रुजवणूक आणि सन्मानाचा संदेश केंद्रप्रमुख राहुल संसारे यांच्या संकल्पनेतून 'मूल्यवर्धन : मूल्यांची रुजवणूक व सन्मान' हा विषय रांगोळीच्या माध्यमातून आकर्षक पद्धतीने साकारण्यात आला. शोभा सावकारे आणि कविता पाटील यांनी रांगोळीचे रेखाटन केले.

सरकार बॅलेट पेपरवरील निवडणुकांना घाबरते"

रोहिणी खडसेंची पुन्हा मागणी; महाविकास आघाडीच्या कामगिरीनंतर सरकारवर निशाणा

जन सम्राट टाईम्स

जळगाव । प्रतिनिधी : विधानपरिषद निवडणुकीच्या निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या महिला नेत्या रोहिणी खडसे यांनी पुन्हा एकदा बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी केली आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीने पाचपैकी तीन जागा जिंकल्याचा उल्लेख करत त्यांनी सरकारवर टीका केली. "बॅलेट पेपरवरील निवडणुकांवर आमचा विश्वास आहे; मात्र सरकार बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यास घाबरत आहे," असा आरोप त्यांनी केला. माध्यमांशी संवाद साधताना रोहिणी खडसे म्हणाल्या की, विधानपरिषद निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेले यश हे नेते आणि पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या मेहनतीचे तसेच मतदारांनी दाखवलेल्या विश्वासाचे फलित आहे. राज्यातील महायुती सरकारबाबत नागरिकांमध्ये नाराजी असल्याचा दावाही त्यांनी केला. पेपरफुटी प्रकरणावर सरकारला घेरले विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर बोलताना रोहिणी खडसे यांनी पेपरफुटी प्रकरणाचा मुद्दा उपस्थित केला. या प्रकरणातील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी विद्यार्थ्यांची



मागणी आहे. विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले, तरी दोषींवर अपेक्षित कारवाई झालेली दिसत नाही, अशी टीका त्यांनी केली. पदवीधर मतदारांनी मतदानातून आपला रोष व्यक्त केल्याचेही त्या म्हणाल्या. ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर काही भागांत दिसत असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक जिल्ह्यांत कुपोषित बालकांची संख्या मोठी असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. महिला आघाडीच्या दौऱ्यातून ग्रामीण भागातील महिलांच्या आणि मुलींच्या समस्या जाणून घेतल्या जात आहेत. या दौऱ्यात समोर येणारे प्रश्न पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांमार्फत सरकारपुढे मांडण्यात येतील, असे खडसे यांनी स्पष्ट केले. महिलांच्या गर्भाशय काढण्याच्या घटनांवर चिंता महिलांच्या आरोग्य आणि रोजगाराच्या प्रश्नावर बोलताना रोहिणी खडसे यांनी ऊसतोड कामगार महिलांच्या गर्भाशय काढण्याच्या घटनांचा उल्लेख केला. रोजगाराचा दिवस बुडू नये किंवा मासिक पाळीच्या काळात कामावर गैरहजेरी राहू नये, या दबावातून महिलांना गर्भाशय काढण्यास भाग पाडले जाण्याच्या घटना दुर्दैवी असल्याचे त्या म्हणाल्या. महिलांचा रोजगार बुडत असल्यास त्यांना आर्थिक आधार देण्यासाठी सरकारने स्वतंत्र पॅकेज जाहीर करावे, अशी मागणीही त्यांनी केली. महिलांच्या आरोग्याचा आणि रोजगाराचा प्रश्न केवळ वैयक्तिक पातळीवर न पाहता सरकारने धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

पाथरी न्यायालयाच्या प्रस्तावाला मंजुरी द्या!

जन सम्राट टाईम्स



परभणी | प्रतिनिधी : पाथरी येथे प्रस्तावित न्यायालय लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय मान्यता, न्यायाधीश व कर्मचाऱ्यांची पदनिर्मिती तसेच अनुषंगिक खर्चास मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी आमदार राजेश विठेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी काल मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. पाथरी येथील प्रस्तावित न्यायालय सुरू करण्यासाठी शासन निर्णय तातडीने निर्गमित करावा. तसेच न्यायालयासाठी स्वतंत्र नवीन इमारत आणि न्यायाधीशांच्या निवासस्थानाच्या बांधकामाचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत तातडीने मंजूर करावा, अशी मागणीही आमदार विठेकर यांनी निवेदनाद्वारे केली. पाथरी येथे न्यायालय सुरू झाल्यास परिसरातील नागरिकांना न्यायालयीन कामकाजासाठी दूरच्या ठिकाणी जाण्याची गरज कमी होईल. त्यामुळे न्यायालयाच्या प्रस्तावाला लवकर मंजुरी मिळावी आणि आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून न्यायालय प्रत्यक्षात सुरू करावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

कुऱ्हा हरदो शाळेत केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात संपन्न!

जन सम्राट टाईम्स

कुऱ्हा हरदो । प्रतिनिधी: विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी शिक्षकांनी बदलत्या शैक्षणिक प्रवाहानुसार स्वतःला अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या ज्ञानात आणि अध्यापन कौशल्यात भर घालून त्याचा प्रत्यक्ष उपयोग विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी व्हावा, या उद्देशाने कुऱ्हा हरदो येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात पार पडली. बुधवार, दि. २८ ऑक्टोबर २०२६ रोजी गटशिक्षणाधिकारी अनिता परमार आणि शिक्षण विस्तार अधिकारी हरी नानकर यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेलवड केंद्राच्या केंद्रप्रमुख प्रतिमा चौधरी होत्या. केंद्रातील मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंदाचे शाळेतील विद्यार्थ्यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात व पुष्पवृष्टी करून उत्साहात स्वागत केले. राष्ट्रगीत आणि महाराष्ट्रगीताने परिषदेची सुरुवात झाली. त्यानंतर क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस केंद्रप्रमुख प्रतिमा चौधरी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.

डॉ. वैशाली संसारे आणि इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी दीक्षा इंगळे व लक्ष्मी इटणारे यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी उत्कृष्टपणे पार पाडली. इयत्ता सहावी व सातवीच्या विद्यार्थिनींनी 'होऊ गुणवंत आम्ही' हे ईशस्तवन सादर केले, तर इयत्ता पहिली, दुसरी व तिसरीच्या विद्यार्थिनींनी 'वेलकम' या गीतावर सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. विद्यार्थिनींच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रप्रमुख व उपस्थित शिक्षकांनी रोख बक्षिसे देऊन त्यांचे कौतुक केले. शिक्षण परिषदेचे प्रास्ताविक छाया बहुरूपे यांनी केले. केंद्रप्रमुख प्रतिमा चौधरी यांनी बदलत्या काळानुसार शिक्षण क्षेत्रातील नवनवीन संकल्पना, प्रश्न आणि शंकांचे निरसन होणे गरजेचे असल्याचे सांगितले. शिक्षकांना अद्ययावत शैक्षणिक माहिती मिळावी आणि तिचा उपयोग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व्हावा, हाच शिक्षण परिषदेचा मुख्य हेतू असल्याचे स्पष्ट करत त्यांनी प्रशासकीय विषयांवर मार्गदर्शन केले. शैक्षणिक गुणवत्तेसाठी विविध विषयांवर मार्गदर्शन परिषदेत विविध विषयतज्ज्ञांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. बीआरसी विषयतज्ज्ञ संगीता शेरकी यांनी शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीबाबत माहिती दिली. भारती पाटे यांनी निपुण अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचा श्रुतलेखनाचा सराव प्रभावीपणे कसा घ्यावा, याविषयी मार्गदर्शन केले. विशेष शिक्षक पद्माकर पाटील यांनी प्रशस्त ॲपची माहिती दिली, तर बोदवड तालुका मूल्यवर्धन समन्वयक गणेश पाटील यांनी मूल्यवर्धन उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट केले.रवींद्र गवळी यांनी मासिक नियोजन सादर केले. डीआरजी सदस्य नितीन लांडे यांनी उपस्थित शिक्षकांसाठी कृतीयुक्त मूल्यवर्धन उजळणी प्रशिक्षण घेतले.

जिद्द, शिस्त आणि सातत्यपूर्ण मेहनत हाच यशाचा मंत्र! पालकमंत्री

पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण शिबिराला ४०० हून अधिक युवक-युवतींचा प्रतिसाद

जन सम्राट टाईम्स

पाळधी, जळगाव । प्रतिनिधी: ग्रामीण भागातील युवक-युवतींमध्ये गुणवत्ता, जिद्द आणि कर्तृत्वाची कमतरता नाही. त्यांना गरज आहे ती योग्य मार्गदर्शन, संधी आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची. आयुष्यात मोठी स्वप्ने पाहा; मात्र ती प्रत्यक्षात साकार करण्यासाठी कठोर परिश्रम, शिस्त, चिकाटी आणि आत्मविश्वासाची जोड द्या. सातत्यपूर्ण मेहनत आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते. त्यामुळे पोलीस भरतीचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या युवक-युवतींनी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून जिद्दीने तयारी करावी, असे प्रेरणादायी आवाहन पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. जळगाव जिल्हा पोलीस दलातर्फे पाळधी येथे आयोजित पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराला धरणगाव तालुक्यासह परिसरातील ४०० हून अधिक युवक-युवतींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याप्रसंगी पालकमंत्र्यांच्या हस्ते पाळधी पोलीस दूरक्षेत्रात बसविण्यात आलेल्या सौरऊर्जेवर चालणाऱ्या ११ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पणही करण्यात आले. या यंत्रणेमुळे परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. मैदानी सरावासोबत लेखी परीक्षेची तयारीही महत्त्वाची युवकांना मार्गदर्शन करताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले



की, पोलीस भरतीसाठी दररोजच्या मैदानी सरावासोबतच लेखी परीक्षेच्या अभ्यासालाही महत्त्व द्यावे. मोबाईल आणि सोशल मीडियावर अनावश्यक वेळ घालवण्याऐवजी तो वेळ स्वतःचे भविष्य घडवण्यासाठी वापरावा. स्पर्धा मोठी असली तरी मेहनत, शिस्त आणि सातत्याच्या बळावर यश मिळवता येते. ग्रामीण भागातील होतकरू तरुणांना योग्य दिशा देण्यासाठी जिल्हा पोलीस दलाने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असून, युवकांनी या संधीचे यशात रूपांतर करावे, असेही त्यांनी सांगितले. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी प्रास्ताविकातून पोलीस भरती प्रक्रिया, मैदानी व लेखी परीक्षा, आवश्यक तयारी आणि प्रशिक्षण शिबिराचा उद्देश याबाबत सविस्तर माहिती दिली. शिबिरात तज्ज्ञांनी उमेदवारांना शारीरिक तंदुरुस्ती, अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन केले. स्व. आर. आर. आबांच्या आठवणींना भावनिक उजाळा यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी स्वर्गीय आर. आर. आबा पाटील यांच्या आठवणींना भावनिक उजाळा दिला. आज गोरगरीब, शेतकरी आणि कष्टकरी कुटुंबांतील मुले-मुली पोलीस दलात भरती होऊन आपल्या आई-वडिलांची स्वप्ने साकार करीत आहेत. याचे श्रेय स्वर्गीय आर. आर. आबांना जाते, असे त्यांनी नमूद केले. कष्टकऱ्याचे मूल जेव्हा पोलीस गणवेश परिधान करते, तेव्हा तो केवळ त्या तरुणाचा विजय नसतो, तर आई-वडिलांच्या घामाचा आणि त्यागाचा सन्मान असतो.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

ठाकरे बंधू आणि फडणवीसांच्या चर्चेवर गुलाबराव पाटलांची टिप्पणी

जन सम्राट टाईम्स



जळगाव । प्रतिनिधी : मुंबईतील पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकाच व्यासपीठावर उपस्थिती लावल्याने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. कार्यक्रमापूर्वी या नेत्यांमध्ये बंद दाराआड चर्चा झाल्याचीही माहिती समोर आल्याने विविध राजकीय तर्कवितर्क लढवले जात आहेत. या चर्चांवर राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी आपल्या खास मिश्किल शैलीत प्रतिक्रिया दिली. माध्यमांशी संवाद साधताना बंद दाराआड झालेल्या चर्चेबाबत विचारले असता गुलाबराव पाटील म्हणाले, "ते एकत्र चहा प्यायला बसले होते, असे मला सूत्रांकडून कळले.

त्यांच्या या मिश्किल उत्तरामुळे उपस्थितांमध्ये हास्याचे वातावरण निर्माण झाले. मात्र, या भेटीमागे कोणते राजकीय समीकरण आहे किंवा भविष्यात काही नवे राजकीय बदल घडणार आहेत का, यावर त्यांनी थेट भाष्य करणे टाळले. राज ठाकरे यांच्याबाबतही त्यांनी प्रतिक्रिया देण्याचे टाळले. नवनाथ बन यांच्या टीकेवर म्हणाले, व्यक्तीचे विधान म्हणजे पक्षाची भूमिका नव्हे! भाजप आणि शिवसेना शिंदे गटातील वाद तसेच भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी केलेल्या टीकेबाबत विचारले असता गुलाबराव पाटील म्हणाले, "एका व्यक्तीने म्हटले म्हणजे पक्षाने म्हटले असे होत नाही. नवनाथ बन हे शेवटी प्रवक्ते आहेत. निर्णय घेण्याचे अधिकार मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना असतात." स्थानिक पातळीवरील निवडणूक प्रक्रियेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, संबंधित ठिकाणी स्थानिक पदाधिकारी सहभागी होते. त्यामुळे तेथील परिस्थितीची माहिती स्थानिक पदाधिकाऱ्यांना आहे. पक्ष अशा घटनांबाबत अहवाल मागवत असतो. त्यानुसार अहवाल मागवून पुढील निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावेच लागेल निवडणुकीसंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावर भाष्य करताना गुलाबराव पाटील म्हणाले, "न्यायालयाच्या निर्णयाच्या बाहेर कोणालाही जाता येत नाही. न्यायालय जो निर्णय देईल, त्याचे सर्वांना पालन करावे लागेल." उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे पुन्हा एकत्र येण्याबाबत आमदार रवींद्र धंगेकर यांनी केलेल्या दाव्यावर प्रतिक्रिया देताना, "हे धंगेकरांचे व्यक्तिगत मत असावे, असे मला वाटते," असे त्यांनी सांगितले. जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी! जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीबाबत बोलताना गुलाबराव पाटील यांनी बिनविरोध निवडणुकीची भूमिका मांडली. "जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी आमची भूमिका आहे. काँग्रेसने जी भूमिका मांडली, तीच आमची भूमिका आहे. जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध झाली पाहिजे," असे त्यांनी स्पष्ट केले.

जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक: रजनीताई सावकारे यांची बिनविरोध निवड!

जन सम्राट टाईम्स



भुसावळ । प्रतिनिधी : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत भुसावळ विविध कार्यकारी सोसायटी मतदारसंघातून सौ. रजनीताई सावकारे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या या उत्तुंग विजयाबद्दल सर्वच स्तरातून आणि कार्यकर्त्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सहकार क्षेत्रात आपल्या कार्यकुशलतेचा आणि जनसंपर्काचा ठसा उमटवणाऱ्या सौ. रजनीताई सावकारे यांनी बँकेच्या सहकार चळवळीत नेहमीच मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या बिनविरोध निवडीमुळे भुसावळ तालुक्यातील सोसायटी नेटवर्क आणि शेतकरी वर्गाला अधिक बळ मिळणार आहे. उत्तुंग नेतृत्वाचा विजय सौ. रजनीताई सावकारे यांच्या बिनविरोध निवडीमुळे भुसावळ तालुक्यातील त्यांच्या लोकप्रियतेवर आणि सहकार क्षेत्रातील पकडीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. शेतकरी, सभासद आणि विविध कार्यकारी संस्थांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्या नेहमीच तत्पर असतात. त्यांच्या या निवडीमुळे जळगाव जिल्हा बँकेच्या कारभारात अधिक पारदर्शकता आणि शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले जातील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण सौ. रजनीताई सावकारे यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर होताच भुसावळ शहरासह ग्रामीण भागात कार्यकर्त्यांनी जोरदार जल्लोष केला. कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. "जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही शेतकऱ्यांची जीवनवाहिनी आहे. या बँकेच्या माध्यमातून भुसावळ तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याला आणि विकास सोसायट्यांना सर्वतोपरी मदत करणे, हेच माझे मुख्य ध्येय राहील. माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मी सर्व सभासद, नेतेमंडळी व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानते." — सौ. रजनीताई सावकारे त्यांच्या या बिनविरोध निवडीबद्दल लोकप्रतिनिधी, विविध संस्थांचे पदाधिकारी, शेतकरी आणि हितचिंतकांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले असून पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. ल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत भुसावळ विविध कार्यकारी सोसायटी मतदारसंघातून सौ. रजनीताई सावकारे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या या उत्तुंग विजयाबद्दल सर्वच स्तरातून आणि कार्यकर्त्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. सहकार क्षेत्रात आपल्या कार्यकुशलतेचा आणि जनसंपर्काचा ठसा उमटवणाऱ्या सौ. रजनीताई सावकारे यांनी बँकेच्या सहकार चळवळीत नेहमीच मोलाचे योगदान दिले.

जिल्हा बँक निवडणुकीत मंत्री गुलाबराव पाटील मैदानात; उमेदवारी अर्ज दाखल

जन सम्राट टाईम्स



जळगाव (प्रतिनिधी): जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापू लागले असून, राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी आणि त्यांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण ही निवडणूक लढवत असल्याची भूमिका त्यांनी यावेळी व्यक्त केली. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. महायुतीतील घटक पक्षांमध्ये जागावाटपावरून चर्चा सुरू असतानाच भाजप स्वबळावर निवडणूक लढविण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील समीकरणे कोणते वळण घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपच्या स्वबळावर निवडणूक लढविण्याच्या चर्चेबाबत प्रतिक्रिया देताना मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, सध्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. भाजपने स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतल्यास त्यांच्याशी चर्चा केली जाईल आणि त्यानंतर पुढील योग्य तो निर्णय घेतला जाईल. गुलाबराव पाटील यांच्या उमेदवारीमुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील चुरस वाढण्याची शक्यता आहे. महायुतीतील जागावाटप, विविध पक्षांची भूमिका आणि स्थानिक नेत्यांची रणनीती यावर निवडणुकीचे पुढील चित्र अवलंबून राहणार आहे. त्यामुळे आगामी काळात जिल्हा बँकेच्या राजकारणात कोणती नवी समीकरणे आकाराला येतात, याची उत्सुकता निर्माण झाली आहे. जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापू लागले असून, राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी आणि त्यांच्या विविध प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण ही निवडणूक लढवत असल्याची भूमिका त्यांनी यावेळी व्यक्त केली. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. महायुतीतील घटक पक्षांमध्ये जागावाटपावरून चर्चा सुरू असतानाच भाजप स्वबळावर निवडणूक लढविण्याच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील समीकरणे कोणते वळण घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

एका बाजूला दुष्काळाचे सावट, दुसरीकडे पुढाऱ्यांच्या वाढदिवसांचा थाट!

जन सम्राट टाईम्स

मलकापूर। प्रतिनिधी: महाराष्ट्रात शेतीसमोरील संकटे, पावसाची अनिश्चितता आणि वाढत्या आर्थिक अडचणींमुळे शेतकरी चिंतेत असताना, दुसरीकडे मलकापूर मतदारसंघात राजकीय नेते आणि पक्षीय पदाधिकाऱ्यांच्या वाढदिवसांचे कार्यक्रम, शुभेच्छांचे बॅनर आणि सत्कार समारंभांची रेलचेल पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या प्रश्नांपेक्षा राजकीय उत्सवांना अधिक महत्त्व दिले जात आहे का, असा सवाल सर्वसामान्य नागरिकांमधून उपस्थित होत आहे. बळीराजासमोर संकटांचा डोंगर शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. मात्र, पावसाची अनिश्चितता, पिकांचे नुकसान, वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला अपेक्षित भाव न मिळणे आणि कर्जाचा वाढता बोजा यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण, दैनंदिन खर्च आणि आगामी हंगामाची तयारी अशा अनेक प्रश्नांनी शेतकऱ्यांची चिंता वाढवली आहे. अशा परिस्थितीत पीकनुकसान भरपाई, पाणीटंचाईवरील उपाययोजना, शेतीसाठी पुरेसा वीजपुरवठा आणि आर्थिक मदत यांसारख्या बाबींवर ठोस निर्णय होणे आवश्यक आहे. शासनाच्या योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे आणि त्यांच्या अडचणींचा शासनदरबारी पाठपुरावा करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मात्र, या प्रश्नांवर प्रत्यक्षात किती प्रभावी काम होत आहे, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. वाढदिवसांचा थाट; शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे काय? दुसरीकडे, राजकीय नेते आणि पक्षीय पदाधिकाऱ्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचे फलक, आकर्षक बॅनर, सत्कार समारंभ आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन होत असल्याचे चित्र दिसत आहे. वाढदिवस साजरा करणे किंवा आनंद व्यक्त करणे चुकीचे नाही; मात्र जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नेत्यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवणेही आवश्यक आहे. एका बाजूला शेतकरी आर्थिक संकटाशी झुंज देत असताना दुसऱ्या बाजूला राजकीय कार्यक्रमांच्या खर्चाबाबत आणि प्राधान्यक्रमाबाबत चर्चा होणे स्वाभाविक आहे. वाढदिवसाच्या निमित्ताने गरजू शेतकऱ्यांना मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, रुग्णांना आर्थिक सहाय्य किंवा ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांसाठी पुढाकार घेतला, तर अशा कार्यक्रमांना सामाजिक बांधिलकीची जोड मिळू शकते. बळीराजाच्या वेदना समजून घेणार कोण? मलकापूर मतदारसंघातील शेतकऱ्यांसाठी पाणी, पीकनुकसान, कर्ज, वीजपुरवठा आणि शेतीमालाला योग्य भाव हे महत्त्वाचे प्रश्न आहेत. या समस्यांवर लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि संबंधित प्रशासनाने समन्वयाने प्रयत्न करण्याची गरज आहे. केवळ आश्वासने किंवा प्रसिद्धीपुरते उपक्रम न करता शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रत्यक्ष कृती होणे अपेक्षित आहे. राजकीय जीवनात वाढदिवस, सत्कार आणि विविध उत्सवांना स्थान असतेच; मात्र जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये. शेतकऱ्यांच्या समस्यांचा शासनदरबारी पाठपुरावा करणे, नुकसानग्रस्तांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि संकटाच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहणे, ही लोकप्रतिनिधींची महत्त्वाची जबाबदारी आहे.

त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर 30 व 31 ऑक्टोबरला बंद;

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याचे आयोजन

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी: आगामी २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे अधिकृत सुरुवात होत आहे. शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत रामकुंड आणि कुशावर्त तीर्थ येथे ध्वजारोहण व ध्वजस्तंभ पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या कारणास्तव त्र्यंबकेश्वर येथील श्री त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर ३० आणि ३१ ऑक्टोबर रोजी सर्वसामान्य भाविकांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे सलग सुमारे ४२ तास भाविकांना नियमित दर्शन घेता येणार नाही. दर १२ वर्षांनी भरणाऱ्या नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर धार्मिक आणि प्रशासकीय पातळीवर तयारी सुरू झाली आहे. या तयारीचा महत्त्वाचा टप्पा म्हणून ३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ध्वजारोहण आणि ध्वजस्तंभ पूजनाचे कार्यक्रम पार पडणार आहेत. या कार्यक्रमांना राज्यातील अनेक अतिमहत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित राहणार असल्याने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरात सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासनाने जारी केलेल्या आदेशानुसार, त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर ३० व ३१ ऑक्टोबर रोजी सर्वसामान्य



भाविकांसाठी बंद राहणार आहे. जिल्हा प्रशासनाकडून अधिकृत पास प्राप्त झालेल्या व्यक्तींनाच दर्शनाची परवानगी असेल. इतर भाविकांना मंदिरात प्रवेश दिला जाणार नाही. सुरक्षा व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था आणि संभाव्य गर्दीचे नियोजन लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि देवस्थान ट्रस्टच्या सचिवांकडून अभिप्राय घेतल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी यासंदर्भातील आदेश जारी केल्याची माहिती आहे.

रामकुंडावर दुपारी १२.०२ वाजता ध्वजारोहण ३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजून २ मिनिटांनी नाशिक येथील रामकुंडावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहणाचा सोहळा पार पडणार आहे.त्र्यंबकेश्वर येथील कुशावर्त तीर्थावर ध्वजस्तंभ पूजन करण्यात येणार आहे. या सोहळ्याला राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील अन्य मंत्री उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे. भाविकांनी दर्शनाचे नियोजन करूनच यावे राष्ट्रपतींचा दौरा आणि धार्मिक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून व्यापक सुरक्षा व्यवस्था व गर्दी नियंत्रणाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी मंदिर बंद राहण्याच्या कालावधीची नोंद घेऊनच प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला सुरुवात होत असताना भाविकांची सुरक्षितता आणि कार्यक्रमांचे नियोजन यांना प्रशासनाकडून प्राधान्य दिले जात आहे. आगामी २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला नाशिक आणिसुरुवात होत आहे. शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत रामकुंड आणि कुशावर्त तीर्थ येथे ध्वजारोहण व ध्वजस्तंभ राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या कारणास्तव त्र्यंबकेश्वर येथील श्री त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर ३० आणि ३१ ऑक्टोबर रोजी सर्वसामान्य भाविकांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे.

धुळ्यात कायद्याचे राज्य की गुन्हेगारांचे?

जन सम्राट टाईम्स

धुळे। प्रतिनिधी: धुळे शहरात आरोपीला अटक करण्यासाठी गेलेल्या आझादनगर पोलिसांच्या पथकावर जमावाने हल्ला केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेत पोलीस निरीक्षकांसह काही पोलीस कर्मचारी किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. पोलिसांच्या कारवाईदरम्यान जमावाने धक्काबुक्की करून आरोपीला पळवून नेल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे पोलिसांच्या कारवाईत अडथळा आणण्याचे धाडस करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.फरार आरोपीला पकडण्यासाठी गेलेल्या पथकाला विरोध मिळालेल्या माहितीनुसार, अनेक दिवसांपासून एका गुन्ह्यात फरार असलेला वडजाई रोड परिसरातील जब्बार शहा गुलाब शाह फकीर याला ताब्यात घेण्यासाठी आझादनगर पोलीस पथक गेले होते. तेथे जमलेल्या काही जणांनी पोलिसांना विरोध करत धक्काबुक्की केली. या गोंधळाचा फायदा घेत आरोपीला पळवून नेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. शासकीय कामात अडथळा; तिघे ताब्यात या घटनेनंतर आझादनगर पोलिसांनी शासकीय कामात अडथळा आणणे आणि पोलिसांशी धक्काबुक्की केल्याप्रकरणी तिघांना ताब्यात घेतले आहे. फरार झालेल्या आरोपीचा शोध सुरू असून, घटनेप्रकरणी संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. पोलिसांच्या पथकावरच अशा प्रकारे हल्ला होत असल्याने शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

राज्यात 50 हजार इलेक्ट्रिक बसेस आणणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी स्वच्छ आणि हरित वाहतुकीला प्राधान्य देत महाराष्ट्रात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्यासाठी राज्य सरकार व्यापक नियोजन करत आहे. पुढील तीन वर्षांत राज्यात ५० हजार इलेक्ट्रिक बसेस आणण्याचे उद्दिष्ट असून, त्यासाठी आवश्यक चार्जिंग इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्याची जबाबदारी सरकार घेणार आहे. महामार्गांसह राज्यभर आवश्यक त्या ठिकाणी चार्जिंग सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.इलेक्ट्रिक वाहन उद्योगाला चालना देण्यासाठी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येत असून, पुणे हे इलेक्ट्रिक वाहन निर्मितीचे महत्त्वाचे केंद्र बनत असल्याचेही त्यांनी नमूद केले. पिनॅकल इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक सुधीर मेहता यांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या सहा नवीन सुविधांच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी, एच. डी. कुमारस्वामी, भाजपचे राष्ट्रीय महामंत्री संतोष जी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, फोर्स मोटर्सचे अध्यक्ष अभय फिरोदिया, सुधीर मेहता आणि सुनंदा मेहता यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सुधीर मेहता यांनी मोबिलिटी क्षेत्रात केलेले काम ही एक नवी क्रांती आहे. एकाच वेळी सहा सुविधांचे उद्घाटन करण्याचा अनुभव माझ्यासाठीही पहिलाच आहे. विकसित भारताच्या दिशेने वाटचाल करताना स्वच्छ आणि हरित मोबिलिटीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. शहरांमधील प्रदूषणात वाहनांचा मोठा वाटा असल्याने पारंपरिक इंधनावरील अवलंबित्व कमी करून इलेक्ट्रिक वाहने आणि पर्यायी इंधनाकडे वळावे लागेल. पुढील तीन वर्षांत महाराष्ट्रात ५० हजार बसेस उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. भारताला इलेक्ट्रिक वाहनांच्या क्षेत्रात आत्मनिर्भर बनविण्यासाठी देशांतर्गत उत्पादन वाढविणे आवश्यक आहे. आगामी काळात इलेट्रिक ट्रक आणि बसची मोठी मागणी असणार आहे. त्यामुळे तीन हजार नव्हे, तर किमान एक लाख ट्रक आणि बस निर्मितीची क्षमता उभारली, तरी देशांतर्गत मागणी पूर्ण होऊ शकणार नाही, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.सुधीर मेहता यांच्या पुढाकारातून इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात सुरू झालेल्या नव्या उपक्रमाचे कौतुक करताना गडकरी म्हणाले, भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. भारतीय उद्योगाचा कणा असलेल्या वाहन उद्योगाचा आकार पूर्वी १५ लाख कोटी रुपये होता. तो आता २२ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. वाहन उद्योगाच्या जागतिक क्रमवारीत भारताने जपानला मागे टाकून तिसरे स्थान मिळविले आहे. अमेरिका ७९ लाख कोटी आणि चीन ४९ लाख कोटी रुपयांच्या उद्योगासह अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

नंदुरबारमधील 80 ते 90 टक्के मजूर स्थलांतरित?

उपाययोजना करा! रतन पाडवी यांची हसन मुश्रीफ यांच्याकडे मागणी

जन सम्राट टाईम्स

धडगाव । प्रतिनिधी: नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण आणि दुर्गम भागांत रोजगाराच्या अपुऱ्या संधींमुळे मोठ्या प्रमाणावर मजूर उपजीविकेसाठी परराज्यांत स्थलांतर करत आहेत. जिल्ह्यातील सुमारे ८० ते ९० टक्के मजूर स्थलांतर करत असल्याचा दावा करत, हे स्थलांतर रोखण्यासाठी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी आक्रमक मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (स्व. अजितदादा पवार गट) प्रदेश सरचिटणीस तथा जिल्हा परिषदेचे माजी सभापती रतन के. पाडवी यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांना पत्र देऊन जिल्ह्यातील मजुरांच्या स्थलांतराचा गंभीर प्रश्न मांडला आहे. रोजगाराच्या शोधात कुटुंबांसह परराज्यांत जाणाऱ्या मजुरांच्या लहान मुलांचे शिक्षण अर्धवट सुटत असून, त्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होत आहे. जिल्ह्यातील कुपोषणाची समस्या अधिक बिकट होण्यासह परराज्यांत मजुरांचे शोषण आणि सुरक्षेचे प्रश्न निर्माण होत असल्याचे पाडवी यांनी निवेदनात नमूद केले आहे. स्थलांतर रोखणारा प्रशासकीय कक्ष नेमका करतोय काय? मजुरांचे स्थलांतर रोखण्यासाठी प्रशासनाकडून प्रभावी पावले उचलली जात नसल्याचा आरोप करत पाडवी यांनी प्रशासनाला जाब विचारला आहे. जिल्ह्यात मजूर स्थलांतर रोखण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे का? तो अस्तित्वात असल्यास हजारो मजूर परराज्यांत स्थलांतर कसे करत आहेत? या कक्षाच्या कामकाजाची जबाबदारी कोणाकडे आहे? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत. मनरेगाच्या कागदोपत्री आकडेवारीवर संशय



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या (मनरेगा) अंमलबजावणीवरही रतन पाडवी यांनी गंभीर आरोप केले आहेत. धडगाव आणि अक्कलकुवा तालुक्यांत मजुरांना प्रत्यक्ष काम उपलब्ध करून देण्याऐवजी केवळ कागदोपत्री कामे दाखवून लोकप्रतिनिधी आणि शासनाची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मनरेगाच्या नोंदींमध्ये मजूर कामावर असल्याचे दाखवले जात असेल, तर प्रत्यक्षात ८० ते ९० टक्के मजूर स्थलांतर का करत आहेत? कागदोपत्री रोजगार आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यामध्ये एवढी तफावत का आहे? असा सवाल उपस्थित करत त्यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. पालकमंत्र्यांकडे चार महत्त्वपूर्ण मागण्या रतन पाडवी यांनी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे पुढील मागण्या केल्या आहेत. १. प्रशासकीय उत्तरदायित्व : मजूर स्थलांतर रोखण्यासाठी नेमण्यात आलेल्या कक्षाच्या कामकाजाची चौकशी करून त्याच्या माध्यमातून प्रभावी उपाययोजना राबवाव्यात. २. मनरेगाची प्रभावी अंमलबजावणी : गावागावांत अकुशल कामांचे शेल्फ तातडीने मंजूर करावे. मजुरांना मागणीनुसार स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देऊन मजुरीचे वेतन वेळेवर मिळण्याची व्यवस्था करावी. ३. सिंचन व स्थानिक उद्योगांना चालना : जिल्ह्यात कृषी आधारित प्रक्रिया उद्योग आणि स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती करणारे गृहउद्योग सुरू करण्यासाठी विशेष योजना राबवाव्यात. ४. विशेष हंगामी रोजगार योजना : धडगाव आणि अक्कलकुवा या अतिदुर्गम तालुक्यांतील मजुरांसाठी विशेष हंगामी रोजगार योजना सुरू करावी. स्थलांतर रोखण्यासाठी केवळ आश्वासने नकोत, प्रत्यक्ष रोजगार हवा! नंदुरबार जिल्ह्यातील मजुरांचे परराज्यांतील स्थलांतर तातडीने रोखून त्यांना गावातच शाश्वत उपजीविकेची साधने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता या प्रश्नांवर शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन संबंधित विभागांना तातडीने योग्य ते आदेश द्यावेत.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

पी.आर. हायस्कूल साजरी करणार 'वाचन दिवाळी'

जन सम्राट टाईम्स



धरणगाव। प्रतिनिधी : ग्रामीण भागातील वंचित विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी आणि त्यांच्यामध्ये वाचन संस्कृती रुजावी, या उद्देशाने धरणगाव येथील पी.आर. हायस्कूलने 'पढेंगे तो बढेंगे' अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना सुबोध ग्रामीण दिवाळी अंकांचे मोफत वितरण केले. या उपक्रमाला विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यंदाचा दीपोत्सव 'वाचन दिवाळी' म्हणून साजरा करण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला. ज्ञानप्रबोधिनी आणि छात्र प्रबोधन, पुणे यांच्या माध्यमातून वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने प्रबोधनदूत डॉ. बापू शिरसाठ यांच्या पुढाकाराने पी.आर. हायस्कूलमध्ये कुमारवयीन विद्यार्थ्यांसाठी सुबोध ग्रामीण दिवाळी अंकांचे वितरण करण्यात आले. इयत्ता पाचवी ते सातवीतील ५० विद्यार्थ्यांना हे अंक विनामूल्य देण्यात आले. वाचनातून विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाला संस्थाध्यक्ष डॉ. अरुण कुलकर्णी, सचिव डॉ. मिलिंद डाहाळे, डॉ. पद्मिनी डाहाळे, शाळेचे मुख्याध्यापक डी. एस. पाटील, पर्यवेक्षक ज्ञानेश्वर कोळी आणि ज्येष्ठ शिक्षिका डॉ. वैशाली गालापुरे उपस्थित होते. सध्या मोबाईलचा वापर समाजजीवनात मोठ्या प्रमाणात वाढत असून, विद्यार्थी वाचनापासून दूर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही बाब लक्षात घेऊन शासनाकडून 'महावाचन', 'वाचन प्रेरणा दिन' यांसारखे उपक्रम राबविले जात आहेत. पी.आर. हायस्कूलनेही महावाचन उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला असून, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासपूरक अवांतर वाचनाची आवड वाढत असल्याचे सांगण्यात आले. मोबाईलच्या आभासी जगाऐवजी पुस्तकांची सोबत यावेळी प्रबोधनदूत डॉ. बापू शिरसाठ यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची ज्ञानग्रहण क्षमता आणि बौद्धिक विकास वाढविण्यासाठी वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी कुठेही मागे राहू नयेत, यासाठी त्यांना अवांतर वाचनाची सवय लागली पाहिजे. मोबाईलच्या आभासी जगाचा अतिरिक्त वापर कमी करून विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. यंदाची दिवाळी फटाक्यांऐवजी वाचनाच्या आनंदातून साजरी व्हावी, या भावनेतून सुबोध दिवाळी अंकांचे मोफत वितरण करण्यात आले. दिवाळी अंक उपलब्ध करून देणाऱ्यांचे आभार दिवाळी अंक वेळेत उपलब्ध करून दिल्याबद्दल छात्र प्रबोधनचे संपादक महेंद्रभाई सेठिया, कार्यकारी संपादिका शिल्पा कुलकर्णी, व्यवस्थापकीय समन्वयक रूपाली बापट आणि ज्योती चौधरी यांचे शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले.

एसआयएस ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रविंद्र किशोर सिन्हा यांचे निधन

सुरक्षा क्षेत्रातील योगदानाचा प्रेरणादायी वारसा मागे

जन सम्राट टाईम्स



नवी दिल्ली । प्रतिनिधी : एसआयएस ग्रुपचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. रविंद्र किशोर सिन्हा यांचे २०२६ मध्ये निधन झाले. त्यांच्या निधनाने सुरक्षा सेवा, कॅश लॉजिस्टिक्स आणि सुविधा व्यवस्थापन क्षेत्रातील एका महत्त्वपूर्ण नेतृत्वाचा अस्त झाला आहे. त्यांच्या निधनाबद्दल उद्योग, व्यावसायिक आणि विविध सामाजिक स्तरांतून शोक व्यक्त केला जात आहे. १९५१ मध्ये जन्मलेल्या डॉ. सिन्हा यांनी दूरदृष्टी, नेतृत्वक्षमता आणि उद्योजकीय कौशल्याच्या बळावर एसआयएस ग्रुपची उभारणी केली. त्यांच्या नेतृत्वाखाली या समूहाने सुरक्षा सेवा, कॅश लॉजिस्टिक्स आणि सुविधा व्यवस्थापन या क्षेत्रांत विस्तार करत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. सेवा, शिस्त आणि मूल्यनिष्ठेला प्राधान्य व्यवसायाकडे केवळ आर्थिक प्रगतीचे साधन म्हणून न पाहता सेवा, शिस्त, मूल्यनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी यांना त्यांनी विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एसआयएस ग्रुपची मोठी हानी झाली असून, त्यांनी उभारलेला संस्थात्मक वारसा आगामी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.एसआयएस ग्रुपचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. रविंद्र किशोर सिन्हा यांचे २०२६ मध्ये निधन झाले. त्यांच्या निधनाने सुरक्षा सेवा, कॅश लॉजिस्टिक्स आणि सुविधा व्यवस्थापन क्षेत्रातील एका महत्त्वपूर्ण नेतृत्वाचा अस्त झाला आहे. त्यांच्या निधनाबद्दल उद्योग, व्यावसायिक आणि विविध सामाजिक स्तरांतून शोक व्यक्त केला जात आहे. यांनी दूरदृष्टी, नेतृत्वक्षमता आणि उद्योजकीय कौशल्याच्या बळावर एसआयएस ग्रुपची उभारणी केली. त्यांच्या नेतृत्वाखाली या समूहाने सुरक्षा सेवा, कॅश लॉजिस्टिक्स आणि सुविधा व्यवस्थापन या क्षेत्रांत विस्तार करत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. सेवा, शिस्त आणि मूल्यनिष्ठेला प्राधान्य व्यवसायाकडे केवळ आर्थिक प्रगतीचे साधन म्हणून न पाहता सेवा, शिस्त, मूल्यनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी यांना त्यांनी विशेष महत्त्व दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एसआयएस ग्रुपच्या माध्यमातून अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. तसेच संघटित सुरक्षा सेवा क्षेत्राच्या विस्ताराला चालना मिळाली. उद्योजकीय नेतृत्वाचा ठसा कायम राहणार संस्थेची उभारणी, तिचा विस्तार आणि सुरक्षा क्षेत्रात निर्माण केलेली विश्वासार्ह ओळख, या माध्यमातून डॉ. सिन्हा यांनी उद्योगविश्वावर आपला ठसा उमटवला. त्यांची दूरदृष्टी, कार्यनिष्ठा आणि संस्थेच्या विकासासाठीचे योगदान दीर्घकाळ स्मरणात राहील. त्यांच्या निधनाने एसआयएस ग्रुपची मोठी हानी झाली असून, त्यांनी उभारलेला संस्थात्मक वारसा आगामी पिढ्यांसाठी

हिंगणघाटच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सौंदर्यीकरण ठरतेय आकर्षणाचे केंद्र!

जन सम्राट टाईम्स



हिंगणघाट (प्रतिनिधी) । हिंगणघाट शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील पुतळा परिसराचे आकर्षक सौंदर्यीकरण सध्या नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी रंगीबेरंगी विद्युत रोषणाई, कारंज्यांतून उडणारे रंगीबेरंगी पाण्याचे तुषार आणि देखणी वास्तुरचना यामुळे संपूर्ण परिसर उजळून निघतो. या मनमोहक दृश्यामुळे नागरिकांची या चौकाला भेट देण्यासाठी गर्दी होत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील पुतळा परिसराला आकर्षक स्वरूप देण्यात आले असून, संसद भवनाच्या धर्तीवरील वास्तुरचनेत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. रात्रीच्या वेळी विद्युत रोषणाईत न्हाऊन निघालेला हा परिसर विशेष लक्षवेधी ठरत आहे. रंगीबेरंगी कारंजे आणि प्रकाशझोतातील पुतळ्याचे दृश्य नागरिकांना आकर्षित करीत आहे. आमदार निधीतून सौंदर्यीकरणाचे काम या सौंदर्यीकरणाचे काम हिंगणघाट विधानसभा मतदारसंघाचे आमदार समीरभाऊ कुणावार यांच्या आमदार निधीतून पूर्ण करण्यात आले आहे. या विकासकामामुळे चौकाच्या सौंदर्यात भर पडली असून, नागरिकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. परिसराला मिळालेल्या आकर्षक स्वरूपाबद्दल आमदार समीरभाऊ कुणावार यांचे नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे. बाबासाहेबांना अभिवादन करताना मनाला मिळते समाधान या परिसराला भेट देणाऱ्या काही नागरिकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

रात्रीच्या वेळी येथे येऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करताना मनाला वेगळीच शांतता आणि समाधान मिळते, असे नागरिकांनी सांगितले. बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यात अनेक दुःखांचा आणि संघर्षांचा सामना करून समाजाला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायाचा मार्ग दाखवला. त्यांच्या संघर्षाची आणि महान कार्याची आठवण ठेवून त्यांना अभिवादन करण्यासाठी आम्ही येथे येतो, अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या. सौंदर्यीकरणासोबत विचारांचेही स्मरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाचे सौंदर्यीकरण केवळ आकर्षक रोषणाई आणि वास्तुरचनेपुरते मर्यादित नाही, तर ते महामानवांच्या विचारांचे स्मरण करून देणारे ठिकाण ठरत आहे. प्रकाशझोतात उजळलेला पुतळा, रंगीबेरंगी कारंजे आणि देखणा परिसर यामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. नागरिकांसाठी हे ठिकाण आकर्षणाचे केंद्र बनण्याबरोबरच बाबासाहेबांना अभिवादन करण्याचे प्रेरणादायी स्थान ठरत आहे.

श्री साईबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षपदी आमदार बापूसाहेब पठारे

जन सम्राट टाईम्स

पुणे (प्रतिनिधी) । चंदननगर, पुणे येथील प्रतिष्ठित श्री साईबाबा मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री साईबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षपदी वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बापूसाहेब पठारे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे. ट्रस्टच्या नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे मंदिर व्यवस्थापन आणि सामाजिक उपक्रमांना नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. यावेळी ट्रस्टच्या अन्य पदाधिकाऱ्यांच्याही नियुक्त्या करण्यात आल्या. त्यानुसार अध्यक्षपदी बापूसाहेब पठारे, व्हाइस चेअरमनपदी महेंद्र पठारे, उपाध्यक्षपदी सुदामराव मते, कार्याध्यक्ष व महाव्यवस्थापकपदी निर्मलकुमार अंचलिया, कोषाध्यक्षपदी पंकज शिंदे, तर कायदेशीर सल्लागारपदी ॲड. दिलीप जेधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. देवेंद्र खवले यांचाही ट्रस्टच्या पदाधिकारी नियुक्तीच्या यादीत उल्लेख



करण्यात आला आहे. सामाजिक उपक्रमांतून सेवाकार्याचा विस्तार श्री साईबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मंदिर व्यवस्थापनाबरोबरच विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, वैद्यकीय आणि शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. ट्रस्टच्या वतीने निःशुल्क सेवा प्रकल्प, रक्तदान शिबिरे, कर्करोग तपासणी शिबिरे तसेच विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने आयोजित केले जातात. या सेवाकार्याचा विस्तार करण्यावर नव्या नेतृत्वाचा भर राहणार असल्याचे सांगण्यात आले. मंदिर विस्तार आणि गरजूंना भवन उपलब्ध करून देण्याचा संकल्प नवनियुक्त अध्यक्ष आमदार बापूसाहेब पठारे यांनी भविष्यात श्री साईबाबा मंदिराचा विस्तार करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. तसेच ट्रस्टच्या माध्यमातून संचालित मातोश्री अनुसया भवन समाजातील गरीब, गरजू आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना उपलब्ध करून देण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला. या उपक्रमामुळे सामाजिक आणि समाजोपयोगी कार्याला अधिक चालना मिळण्याची अपेक्षा आहे. नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीनिमित्त विविध सामाजिक संस्था, संघटना आणि समाजातील मान्यवर व्यक्तींनी त्यांचे स्वागत करून अभिनंदन केले आहे. सदर प्रसिद्धिपत्रक ट्रस्टचे विश्वस्त राजेश सुरेंद्रकुमार अग्रवाल यांनी प्रसिद्धीस दिले आहे. चंदननगर, पुणे येथील प्रतिष्ठित श्री साईबाबा मंदिराचे व्यवस्थापन पाहणाऱ्या श्री साईबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षपदी वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बापूसाहेब पठारे यांची सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली आहे. ट्रस्टच्या नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे मंदिर व्यवस्थापन आणि सामाजिक उपक्रमांना नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेत दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त प्रवेश!

बोदवड शहराध्यक्षपदी श्याम लुंड, तर तालुका संपर्कप्रमुखपदी भगवान सूर्यवंशी यांची निवड

जन सम्राट टाईम्स

बोदवड। प्रतिनिधी: प्रहार दिव्यांग क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने संघटनेचा कार्यविस्तार आणि दिव्यांग बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी बोदवड तालुक्यात संघटनात्मक नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. बोदवड तालुका अध्यक्ष रमेश लोहार यांच्या हस्ते शहराध्यक्षपदी श्याम लुंड, तर तालुका संपर्कप्रमुखपदी भगवान सूर्यवंशी यांची निवड घोषित करण्यात आली.

यावेळी बोदवड शहरासह तालुक्यातील अनेक दिव्यांग बांधवांनी मोठ्या उत्साहात संघटनेत प्रवेश केला. दिव्यांगांच्या समस्या आणि शासकीय योजनांवर चर्चा या कार्यक्रमाला बोदवड शहर व तालुक्यातील दिव्यांग बांधव आणि भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी त्यांच्या विविध अडचणी, समस्या आणि शासकीय योजनांबाबत सविस्तर चर्चा करून तक्रारी जाणून घेण्यात आल्या.



विशेषतः संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत काही लाभार्थ्यांना १ हजार ५०० रुपये, तर काही लाभार्थ्यांना २ हजार २०० रुपये अनुदान मिळत असल्याचा मुद्दा चर्चेत आला. तसेच अनेक दिव्यांग बांधव धान्यापासून वंचित असल्याची बाबही उपस्थितांनी मांडली. यावेळी लाभार्थ्यांना शासकीय योजनांची माहिती देऊन आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने वरिष्ठ शासकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून दिव्यांग बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही तालुका अध्यक्ष रमेश लोहार यांनी दिली. केवळ आश्वासने नव्हे, हक्कांसाठी प्रत्यक्ष पाठपुरावा दिव्यांग बांधवांना केवळ आश्वासने न देता त्यांच्या हक्कांसाठी प्रत्यक्ष पाठपुरावा करणे, शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे आणि त्यांच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचविणे हा संघटनेचा मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. दिव्यांगांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती या कार्यक्रमाला प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे बोदवड तालुका अध्यक्ष रमेश लोहार, उपाध्यक्ष बाळू पाटील, नवनियुक्त शहराध्यक्ष श्याम लुंड, तालुका संपर्कप्रमुख भगवान सूर्यवंशी, तालुका सल्लागार प्रल्हाद बेद्रे, प्रहार सेवक आबाराव देशमुख, अशोक तायडे, सामाजिक कार्यकर्ते सचिन उगले, महिला आघाडी तालुकाध्यक्ष खुशबू शर्मा, तालुका उपाध्यक्ष मनीषा गोंधळी, तालुका उपसचिव मायाताई गवळी, तालुका सल्लागार संगीताताई वारुळे, योगेश देशमुख, गजानन गवळी, मेहंदी गुड्डू यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि दिव्यांग बांधव-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे उपस्थितांनी अभिनंदन केले. दिव्यांग बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटनेच्या माध्यमातून एकजुटीने लढा देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. प्रहार दिव्यांग क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने संघटनेचा कार्यविस्तार आणि दिव्यांग बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी बोदवड तालुक्यात संघटनात्मक नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या. बोदवड तालुका अध्यक्ष रमेश लोहार यांच्या हस्ते शहराध्यक्षपदी श्याम लुंड, तर तालुका संपर्कप्रमुखपदी भगवान सूर्यवंशी यांची निवड घोषित करण्यात आली. यावेळी बोदवड शहरासह तालुक्यातील अनेक दिव्यांग बांधवांनी मोठ्या उत्साहात संघटनेत प्रवेश केला.

ममुराबादच्या पाणीप्रश्नावर तापी नदीपात्रात पाहणी !

जन सम्राट टाईम्स

ममुराबाद। प्रतिनिधी: ममुराबाद गावाला सुरळीत आणि नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी ग्रामपंचायत आणि प्रशासकीय यंत्रणेच्या सहकार्याने उपाययोजनांना सुरुवात करण्यात आली आहे. गावातील पाणीटंचाईचा प्रश्न लक्षात घेऊन उपसरपंच विलास सोनवणे यांनी पुढाकार घेतला असून, त्यांच्या प्रयत्नांतून तापी नदीपात्राची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक कामे करण्यात आली. गावाचा पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टीने उपसरपंच विलास सोनवणे यांनी प्रशासक श्री. दांडगे आणि ग्रामविकास अधिकारी श्री. महाजन यांच्यासमवेत तापी नदी परिसराला भेट दिली. यावेळी नदीपात्रातील पाण्याची स्थिती आणि पाणी आणण्याच्या मार्गाची पाहणी करण्यात आली. तसेच जेसीबीच्या साह्याने नदीपात्रात आवश्यक कामे करून ममुराबाद गावासाठी पाण्याचा मार्ग सुकर करण्याचे प्रयत्न करण्यात आले. या पाहणी व कामाच्या वेळी ग्रामपंचायत आणि प्रशासकीय यंत्रणेतील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. ग्रामपंचायतीचे वरिष्ठ लिपिक ज्ञानेश्वर सावळे, पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी बुधा सोनवणे, नितीन देवरे, रमेश सोनवणे तसेच शरद पाटील यांनी उपस्थित राहून कामात योगदान दिले.गावकऱ्यांना नियमित पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी उपसरपंच विलास सोनवणे यांनी दाखवलेली तत्परता आणि घेतलेला पुढाकार याबद्दल ग्रामस्थांकडून त्यांचे आभार व्यक्त केले जात आहेत. या उपाययोजनांमुळे ममुराबादचा पाणीप्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.